**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कांतीलाल मिलापचंद रुणवाल
११४, स्टेशन रोड, ग.नं.५, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर-४१६१०१ अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
(२) **अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा निबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर शहर, जि.कोल्हापूर उत्तरवादी
(१)**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
(२)**जन माहिती अधिकारी** तथा सभापती, जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समिती,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६+१९०+३७७ / कोल्हापूर / २००७-२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.७.२००८,१०.७.२००८ व १८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कांतीलाल मिलापचंद रुणवाल
११४, स्टेशन रोड, ग.नं.५, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर-४१६१०१

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्री.अजित रेळेकर
(२) **अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा निबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर शहर प्रतिनिधी श्री.अरुण काकडे

(१)**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्रीमती संगीता चौगुले
(२)**जन माहिती अधिकारी** तथा सभापती, जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समिती,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.एस.एस.चौगुले

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ८६ | दि.७.१२.२००६ | दि.७.१२.२००६ | दि.२२.१२.२००६ | दि.२२.१.२००७ |
| ३७७ | दि.७.२.२००८ | दि.११.३.२००८ | दि.३१.३.२००८ | दि.१२.५.२००८ |
| १९० | दि.३.१.२००७ | दि.२६.२.२००७ | दि.३.३.२००७ | दि.३.४.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>**अपील क्र.८६+१९०**<br>जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील प्लॉट नं.१४८ ते १५४ व ३०९ ते ३११ वापरात नसलेने शासन परिपत्रक क्र.एनएए १०००/प्र.क्र./२४९/ल५ अन्वये अकृषिक साऱ्यातून सूट मिळेल किंवा नाही, प्लॉटवर घर बांधलेले नसताना वापरात नसलेल्या प्लॉटवर घरपट्टी कोणत्या कायद्याच्या आधारे लावली, कसलीही सेवा न देता सेवाकर मागणे कोणत्या कायद्यात बसते?<br>**अपील क्र.३७७**<br>जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील प्लॉट नं.१४८ ते १५४ व ३०९ ते ३११ वापरात नसताना कर भरणे गरजेचे आहे काय, ७/१२ वर प्लॉटधारकाचे नाव लागल्यानंतर कर देणे कायदेशीर आहे किंवा नाही, अकृषिक कर भरल्याशिवाय बांधकाम परवानगी देत नाही हे कायदेशीर आहे काय, बांधकाम केले नसताना घरपट्टी, सेवा कर आकारणी वसुली शासनाकडून केली जाते. हे अधिकार कृषी उत्पन्न बाजार समितीस दिले आहेत काय, हे कर कायद्यात बसत नसतील तर ते ताबडतोब बंद करण्याची सूचना करण्याचा अधिकार कोणाला? | | | |

## विवेचन

जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील प्लॉट नं.१४८ ते १५४ व ३०९ ते ३११ या भूखंडावरील अकृषिक कर, बांधकाम परवानगी, घरफाळा इ.बाबत जन माहिती अधिकारी तथा सभापती, जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समिती व जन माहिती अधिकारी तथा

चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे अपीलकर्ता श्री.कांतीलाल मिलापचंद रुणवाल यांनी माहिती मागितली होती. परंतु योग्य माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी केलेले अपील अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर शहर व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांनी फेटाळले. तसेच माहिती त्वरित व नि:शुल्क देण्याचा आदेश जिल्हा उपनिबंधक, कोल्हापूर श्री.संजय रानगे यांनी देऊनही जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समितीने माहिती दिली नाही, या कारणावरुन श्री.रुणवाल यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले केली आहेत.

दि.१३.५.२००८ व ११.११.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. श्री.रुणवाल याना माहिती व त्यांच्या प्रश्नांबाबत खुलासा वेळावेळी देण्यात येऊनही ते सातत्याने त्याच स्वरुपाचे अर्ज करीत असतात, असे जन माहिती अधिकारी श्रीमती संगीता चौगुले व अपिलीय प्राधिकारी श्री.अजित रेळेकर यांनी प्रपत्रात नमूद केले, तर आपल्याला समाधानकारक माहिती मिळाली नसल्याचे व प्रलंबित विषयांचा निर्णय झाला नसल्याचे सविस्तर प्रतिपादन श्री.रुणवाल यांनी लेखी निवेदनाद्वारे केले.

आपण मागणी केल्याप्रमाणे माहिती मिळालेली नाही, मोकळ्या प्लॉटवर बांधकाम नसताना कर आकारणी करता येते का इ. अनेक मुद्दयांची माहिती आपण मागितली असून जन माहिताी अधिकारी ती देण्यास सातत्याने टाळाटाळ करीत आहेत, असे प्रतिपादन श्री.रुणवाल यांनी अपील क्र.३७७ मध्ये केले. श्री.रुणवाल व त्यांचे कुटुंबीय यांचे नावावर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात दहा भूखंड आहेत. आपण सदर प्लॉटवर बांधकाम करण्यासाठी परवानगीबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीकडे विचारणा केली असता सन १९८५ पासूनचे अकृषिक कर, घरपट्टी, सेवाकर वगैरे भरणा केल्यानंतरच बांधकामाला परवानगी दिली जाईल, असे कळविले जाते. तसेच रकमा भरल्यानंतरच ७/१२ ला नाव लावण्याबाबत ना हरकत दाखला दिला जाईल, असेही कळविले जाते, या जाचक अटींमुळे आपल्याला भूखंडावर बांधकाम करता आले नाही. प्लॉटचे रजिस्टर डीड झाले असताना नियमाप्रमाणे १५ दिवसांच्या आत आपले नाव

७/१२ ला नोंद झालेले नाही हे कायदेशीर आहे काय, या अनुषंगाने आपण विविध मुद्दयांची विचारणा करीत आहेत. परंतु कृषी उत्पन्न बाजार समिती किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून समाधानकारक खुलासा व बांधकामाला परवानगी मिळत नाही, असे प्रतिपादन श्री.रुणवाल यांनी लेखी व तोंडी केले.

भूखंड मंजूर करण्याच्या आदेशातच कर आकारणीबाबतचा संपूर्ण तपशील दिलेला आहे. तसेच विविध पातळीवर श्री.रुणवाल करीत असलेल्या अर्जांनुसार संपूर्ण माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मागितलेली , परंतु कृषी उत्पन्न बाजार समितीकडे असलेली माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीकडून घेण्यास त्यांना कळविले होते. त्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीकडून घेऊनही ही माहिती दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर श्रीमती संगीता चौगुले यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. श्री.रुणवाल यांनी माहितीच्या अधिकारातच नव्हे, तर अन्य अर्जांद्वारेही मागितलेली माहिती त्यांना वेळोवेळी दिलेली आहे. दि.२४.११.२००० च्या अर्जान्वयेसुध्दा त्यांच्या प्रश्नांबाबतचा संपूर्ण खुलासा करणारी माहिती त्यांना दिलेली आहे, मात्र ते पुनः पुन्हा त्याच मुद्दयांची विचारणा करीत असतात, असे कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रभारी सचिव श्री.एस.ए.चौगुले यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. श्री.रुणवाल यांनी केलेल्या २३ अर्जांचा व त्यावर केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण तपशील त्यांनी सादर केला. माहितीच्या अधिकारा अंतर्गत श्री.रुणवाल यांनी १४ वेळा त्याच मुद्दयांबाबत अर्ज केला व त्या प्रत्येक अर्जावर त्यांना संपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे, असे जिल्हाधिकारी कार्यालय व कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या अपिलीय प्राधिकाऱ्यांनी तपशिलासह नमूद केले. जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समितीने बांधकामाला परवानगी दिली नाही, ती महसूल खात्याने द्यावी, अशी श्री.रुणवाल यांची मागणी असल्याचे प्रतिपादन श्रीमती संगीता चौगुले व श्री.अजित रेळेकर यांनी केले.

जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जाचक अटींमुळे ४०० भूखंडांपैकी केवळ २-३ भूखंडावरच बांधकाम केले आहे. कोणत्याही प्रकारची सेवा न देता सेवा कराची रक्कम आकारली जाते हे कोणत्या कायद्यात बसते, अशी विचारणा करुन श्री.रुणवाल यांनी बाजार समितीतील

व्यापाऱ्यांच्या विकासाबाबत अनेक मुद्दे लेखी निवेदनामध्ये मांडले आहेत. या मुद्दयांचा, तसेच कर आकारणी कायदेशीर की बेकायदेशीर अशांसारख्या प्रश्नांचा विचार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत करता येणार नाही. तसेच मागितलेल्या माहितीवर जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तराबाबत पुरवणीप्रश्न उपस्थित करुन त्यांची माहिती न मिळाल्याची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कार्यवाहीविषयक पध्दतीशी सुसंगत नाही. कर आकारणी अधिकाऱ्यांची किंवा बाजारसमितीची कोणतीही कृती बेकायदेशीर अथवा नियमबाह्य आहे असे अपीलकर्त्याचे म्हणणे असल्यास त्याबाबत योग्य त्या न्यायासनाकडे दाद मागण्याचा मार्ग त्यांना उपलब्ध आहे. मात्र त्याच विषयाबाबत तीच तीच विचारणा सातत्याने करुन प्रशासकीय यंत्रणेवर ताण निर्माण करणे योग्य नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शाम ज्ञानदेव सातपुते
३९/५, पी.एम.सी.कॉलनी, कुसाळकर पुतळा चौक,
जनवाडी, गोखलेनगर, पुणे-४११०१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे-४११००४ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे-४११००४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७२ / पुणे /२००७ |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.२७.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे-४११००४ श्री.अ.भा.देशपांडे

**जन माहिती अधिकारी** तथा
बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे-४११००४ श्री.अ.म.कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.५.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००२ ते २००७ या कालावधीतील प्रा.विकास मठकरी यांची कॉलेजला हजर असलेल्या व सध्या असलेल्या रजिस्टरच्या छायांकित प्रती, सेवापुस्तकातील रजेच्या नोंदी, मासिक पगारपत्राच्या छायांकित प्रती, विशेष रजेव्यतिरिक्त अन्य रजा, किरकोळ रजा व वैद्यकीय रजा इत्यादींबाबतची माहिती. |
|---|---|

## विवेचन

प्रा.विकास मठकरी यांच्या सन २००२ ते २००७ या काळातील बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणेमधील हजेरीपत्रकावरील स्वाक्षरीसह नोंदी व पगारपत्रकाच्या प्रती आदी माहिती अपीलकर्ता श्री. शाम नामदेव सातपुते यांनी जन माहिती अधिकारी तथा बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे यांच्याकडे मागितली होती. आपण विचारणा केलेल्या तपशिलाबाबत काही माहिती संकलित करावयाची आहे व परीक्षांच्या कालावधीमुळे कार्यालयीन कामासह वेळ लागेल. यामुळे ही माहिती आठ दिवसांच्या आत देता येणे शक्य नाही. माहितीच्या अधिकारासंबंधी नियमानुसार आवश्यक अशा मुदतीत माहिती देण्याचे अथवा योग्य ते आपणांस कळविण्याचे करण्यात येईल, असे महाविद्यालयाचे प्राचार्य अ.भा.देशपांडे यांनी श्री.सातपुते यांना दि.१.३.२००७ रोजी कळविले. सर्व प्राध्यापकांचे हजेरीपत्रक एकत्र असल्यामुळे त्याच्या प्रती देता येणार नाहीत. सेवापुस्तकातील रजेच्या व इतर नोंदी आणि मासिक पगारपत्रक ही वैयक्तिक माहिती असल्यामुळे प्रती देता येणार नाहीत. प्रा.विकास मठकरी यांनी विशेष रजा, वैयक्तिक अन्य रजा, सध्याचे वेतन व विनावेतन स्वरुपाच्या घेतलेल्या आहेत, असे प्राचार्य अ.भा.देशपांडे यांनी श्री.सातपुते यांना दि.२८.३.२००७ रोजी कळविले.

संबंधित माहिती गोपनीय नसल्यामुळे ती आपल्याला मिळाली पाहिजे, या मागणीसाठी श्री.सातपुते यांनी अपिलीय प्राधिकारी, बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या वतीने प्राचार्य देशपांडे यांनी मूळचे उत्तर कायम केले व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८(जे) नुसार प्रा.मठकरी यांच्यासंबंधीची वैयक्तिक माहिती

देता येत नसल्याचे कळविले. संबंधित महाविद्यालय हे सार्वजनिक प्राधिकरण असून त्या सेवकांची नियमानुसार ठेवली जाणारी माहिती आपण मागितली आहे, त्यामुळे कलम ८(जे) अन्वये ती गोपनीय ठरु शकत नाही. तसेच संबंधित व्यक्ती ही लोकप्रतिनिधी असून पुणे महानगरपालिकचे सभासद या नात्याने कार्यरत आहेत. त्यांचया सेवाविशयक अशी माहिती सार्वजनिक सवरुपाची आहे, म्हणून ती आपल्याला मिळाली पाहिजे, अशी मागणी श्री.सातपुते यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

दि.२७.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता पूर्वपरवानगीने गैरहजर होते व जन माहिती अधिकारी श्री.अ.म.कुलकर्णी व अपिलीय प्राधिकारी प्रायार्य अ.भा.देशपांडे हे हजर होते. श्री.सातपुते यांच्या अर्जाला उत्तर देण्यास विलंब झालेला नाही, तथापि ज्या व्यक्तीबद्दल माहिती मागितली आहे त्यांची अनुमती नसल्याने सेवापुस्तक, पगारपत्रक व हजेरीपत्रक यासंबंधी माहिती देण्यात आलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनमय २००५ मधील कलम ८(ज) नुसार माहिती दिलेली नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले.

उभय बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे पाहता श्री.सातपुते यांनी मागितलेली माहिती नाकारण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांचा व अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय योग्य नाही.

महितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये कोणती माहिती पुरविणे बंधनकारक नाही, हे कलम ८ मध्य नमूद केलेले आहे. कलम ८(जे) मध्ये पुढील माहितीचा समावेश आहे :

जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याची, राज्य जन माहिती अधिकाऱ्याची किंवा अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल, ती खेरीजकरुन, जी प्रकंट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करील, अशी वैयक्तिक तपशिलासंबंधातील माहिती

परंतु, जी माहिती संसदेला किंवा राज्य विधानमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासही नकार देता येणार नाही.

वरील तरतूद लक्षात घेता व अपीलकर्त्याचे प्रतिपादन पाहता लोकप्रतिनिधीच्या सार्वजनिक प्राधिकरणातील सेवेविषयीची माहिती ही सार्वजनिक हिताशी संबंधित आहे, एवढेच नव्हे, तर सार्वजनिक प्राधिकरण म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ नुसारही नागरिकांना उपलब्ध असणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ नुसार सार्वजनिक प्राधिकरणांनी स्वयंस्फूर्तीने जाहीर करावयाच्या माहितीत सेवकांच्या सेवाविषयक सर्व माहितीचा समावेश होतो. त्यामुळे अशी माहिती वैयक्तिक ठरत नाही व त्या कारणावरुन ती नाकारता येणार नाही. वैयक्तिक माहितीबाबतचा अन्वयार्थ जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती नाकारण्याचे कारण आहे. हे लक्षात घेता त्यांना शास्ती लावण्याची अपीलकर्त्यांची मागणी अमान्य करण्यात येत आहे. संबंधित माहिती शुल्क आकारुन देणे योग्य ठरेल व अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास ती तशी प्राप्त करुन घेता येईल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी योग्य ते शुल्क आकारुन अपीलकर्त्यास आठ दिवसात द्यावी व पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २०.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. हरी आप्पा प्रक्षाळे
अनिल नगर वीट भट्टीजवळ,पंढरपूर,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी,
पंढरपूर, जि. सोलापूर

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
सांगोला, जि. सोलापूर

जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
मंगळवेढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | ८९०+८९१/ सोलापूर |
| २ | **सुनावणीची तारीख** | दि.२८.१.२००९ |
| ३ | **अपिलीय प्राधिकारी तथा** उपविभागीय कृषि अधिकारी पंढरपूर, जि. सोलापूर, श्री. अभिमान पांडुरंग बरडे **जन माहिती अधिकारी तथा** तालुका कृषि अधिकारी सांगोला, जि. सोलापूर श्री. विकास श्रीपती बंडगर | |
| ४ | **जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख** | दि. ९.१०.२००७ व २४.१०.२००७ |
| ५ | **जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख** | दि. १८.१०.२००७ |
| ६ | **प्रथम अपिलाची तारीख** | दि. ६.१२.२००७ |
| ७ | **अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख** | दि. ११.३.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** **अपील क्र ८९० -** सांगोला तालुक्यातील २००६ व २००७ या वर्षात घेतलेल्या कृषि विस्तार | |

| | |
|---|---|
| | कामाची व प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाची गावनिहाय यादी, तालुक्यात गावनिहाय ठिबक सिंचन साठी दिलेल्या अनुदानाची व लाभर्थ्यांची यादी, कृषि विभागासाठीचे अनुदान व झालेल्या खर्च व इतर सात मुद्यांची माहिती.<br>**अपील क्र ८९१ -** मंगळवेढा तालुक्यात २००६ व २००७ या वर्षात घेतलेल्या कृषि विस्ताराच्या कामाची व प्रशिक्षणाच्या कामाची गावनिहाय यादी व झालेला खर्च, तालुक्यात गावनिहाय ठिबक सिंचनासाठी दिलेल्या अनुदानाची व लाभार्थ्यांची यादी, कृषि विभागासाठी अनुदान व झालेला खर्च व इतर सात मुद्यांची माहिती. |

## विवेचन

अपीलकर्ते श्री. हरी आप्पा प्रक्षाळे यांनी सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील कृषि विस्तार आदि कामांची माहिती जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सांगोला व मंगळवेढा यांच्याकडे मागितली होती. दि.८.१०.२००८ च्या 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रम'तील प्रपत्रात अपीलकर्ते श्री. हरी आप्पा प्रक्षाळे यांनी त्यांना माहिती देण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कुचराईमुळे त्यांना मानसिक व आर्थिक त्रास झाल्याचे नमूद केले.तर जन माहिती अधिकारी यांनी माहिती तयार असल्याचे कळवूनही अपिलकर्त्याने घेतली नाही, यावरून शासकीय अधिका-याना नाहक त्रास देण्याचा अपिलकर्त्याचा हेतू असल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. मात्र संपूर्ण माहिती लेखी स्वरूपात मिळाल्याने तक्रार राहिलेली नाही असे निवेदन अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सांगोला व मंगळवेढा यांना दि. ३०.१.२००९ रोजी सादर केले असून सदर निवेदनाची प्रत तालुका कृषि अधिकारी, सांगोला यांनी दि. ४.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगास सादर केली आहे.

सबब आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

उपरोक्त दोन्ही अपिले (अपील क्र ८९० व ८९१ / सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.३१.०८.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शंकर भगवान काळे
मु.पो.पळसदेव काळेवाडी १ ता.इंदापूर,जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
गट विकास अधिकारी (वर्ग-१)
पंचायत समिती, इंदापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २७.६.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. शंकर भगवान काळे
मु.पो.पळसदेव काळेवाडी १ ता.इंदापूर,जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१)
पंचायत समिती, इंदापूर यांचे प्रतीनिधी श्री. पी.एस.काळे

**जन माहिती अधिकारी** विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती इंदापूर, जि. पुणे श्री. आर.एम. साळुंखे

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. ज्या धरणग्रस्त गावांच्या ( मौजे काळेवाडी नं.१ व पळसदेव ) पाणीपुरवठा विहिरी उजनी धरणाच्या बॅक वॉटरमध्ये बुडालेल्या आहेत, त्या गावांच्या पिण्याच्या पाण्याची काय व्यवस्था केली या बाबत माहिती
२. ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत महत्वाचे कोणते निर्णय कायद्याने घेणे बंधनकारक आहेत, ( उदा. पाणी व लाईट पुरवठा, रस्तादुरूस्ती, घरकुले, गाळेवाटप व इ. ) याबाबतची माहिती
३. मासिक सभेने घेतलेले निर्णय ग्रामसभेत वाचन करणे/ वाचून दाखविणे कायद्याने बंधनकारक आहे किंवा नाही याची माहिती
४. शिक्षण कमिटीचा अध्यक्ष ग्रामपंचायतीचा सरपंचच असतो, याची कायदेशीर माहिती / जी.आर. ची माहिती, तसेच सरपंचाशिवाय इतर सदस्याला किंवा ग्रामस्थाला अध्यक्ष होता येत नाही काय याबाबत माहिती
५. नोकर भरती, गाळे वाटप करणे, नोकरांचा पगार ठरविणे, नोकरांचे कामाचे मूल्यमापन करणेचा अधिकार ग्रामसभेला आहे किंवा मासिक सभेला आहे याची माहिती
६. वर्षामध्ये एकूण किती ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे याची माहिती, व एक जरी ग्रामसभा घेण्याचे टाळले तर कोणती कारवाई केली जाते
७. ग्रामसभेत सरपंच / उपसरपंच हे गरीब ग्रामस्थांवर दबाव टाकून रागाने खेकसून बोलतात, त्यामुळे लोक ग्रामसभेला येण्यासाठी घाबरतात, त्यासाठी सरपंचा /उपसरपंचावर कोणती कारवाई करता येईल याची माहिती

## विवेचन

उजनी धरणग्रस्त गावाच्या पाणीपुरवठा व्यवस्थेच्या अनुषंगाने व ग्रामपंचायतीच्या कामकाजा संदर्भात कायदेविषयक माहिती अपीलकर्ता श्री. शंकर भगवान काळे यांनी गट विकास अधिकाऱ्यांकडे मागितली होती. गट विकास अधिकारी यांनी श्री. काळे यांचा प्रथम अर्ज ग्राम विकास अधिकारी, पळसदेव यांच्याकडे वर्ग केला. 'हवी ती' माहिती दिली नाही, उत्तरे अपुरी व चुकीची आहेत, अशा कारणावरून श्री. काळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, इंदापूर यांच्याकडे अपील केले. परंतु माहिती चुकीची व अपुरी काय आहे हे सविस्तर कळवावे, म्हणजे पुढील सविस्तर कार्यवाही करता येईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, इंदापूर यांनी श्री. काळे यांना कळविले. यांनी या अपिलाची दखल न घेतल्याच्या कारणावरून श्री. काळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. २७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

मागितलेली माहिती आपल्याला मिळाली नाही, तसेच प्रथम अपिलाची सुनावणी घेतली नाही, म्हणून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी श्री. काळे यांनी आयोगापुढील सुनावणीत केली. श्री. काळे यांनी सात मुद्दयांची माहिती मागितली असून 'ग्राम पंचायतीच्या मासिक सभागृहाला आतून कुलूप किंवा कडी लावून गुप्तपणे निर्णय घेतले जातात हे कायदेशीर आहे काय,' अशा स्वरूपाचे प्रश्न विचारले आहेत. ते माहितीच्या अधिकारात येत नाहीत, तरी खुलासेवार उत्तर विहित मुदतीत दिले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर श्री. आर.एम. साळुंखे यांनी सांगितले. तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची सुनावणी घेतल्याचे दिसत नाही, परंतु अपूर्ण व चुकीची माहिती कोणती आहे, याची विचारणा श्री. काळे यांच्याकडे केली होती त्यावर त्यांनी उत्तर दिलेले नाही व आयोगाकडे अपील केले आहे. आयोगाकडे अपील प्रलंबित असल्यामुळे आपण मुक्रर केलेली सुनावणी घेतली नाही, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री. पी.एस. काळे यांनी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे यांचा विचार करता श्री. काळे यांनी मौजे काळेवाडी नं.१ येथे पाणी पुरवठा होत नसल्याची तक्रार केली असून त्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली आहे. श्री. काळे यांच्या अर्जातील बहुसंख्य मुद्दे हे खुलाशाची आणि भाष्याची मागणी करणारे अथवा अभिप्राय विचारणारे आहेत. उदा. मुद्दा क्र. ७ मध्ये 'ग्रामसभेत सरपंच / उपसरपंच हे गरीब ग्रामस्थांवर दबाव टाकून रागाने खेकसून बोलतात, त्यामुळे लोक ग्रामसभेला येण्यासाठी घाबरतात, त्यासाठी सरपंचा /उपसरपंचावर कोणती कारवाई करता येईल.' अशा स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये 'माहिती' ठरत नाही. तसेच प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीच्या अधिकारात येत नाही, त्यामुळे श्री. काळे यांचे अपील दाखल करण्यायोग्य ठरत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश गणपतराव वरूडकर
मु.पो.कसबा ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक ), जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९० + ३६१/ २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ९.७.२००८ |

३. **उपस्थिती**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. आर.पी.झेंडे

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),
जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. शरद गोसावी

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ चे कलम ६ (१) नुसार बहि:स्थ परीक्षा देण्यासाठी मागणी केलेली ८ दिवसांची नामंजूर केलेली अर्जित रजा मंजूर होऊन पगार मिळणेबाबत

**विवेचन**

नामंजूर केलेली आपली रजा मंजूर करण्याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न केल्यामुळे संबंधित जन माहिती

अधिकाऱ्यांना शास्ती करावी, या मागणीसाठी अपीलकर्ता श्री. रमेश गणपतराव वरूडकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. ९.७.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री. वरूडकर हे जय शिवराय हायस्कूल, कसबा ठाणे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या शाळेत शिपाई असून बहि:स्थ परीक्षा देण्यासाठी त्यांनी मागितलेली ८ दिवसांची रजा संस्थेने नामंजूर केली. ती अर्जित रजा मंजूर होऊन पगार मिळावा, यासाठी श्री. वरूडकर यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये माहितीची मागणी केली होती. ती न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांची नामंजूर केलेली रजा मंजूर करण्याबाबत संबंधित संस्थेला शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी कळवावे, असा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. दरम्यान महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ निरसीत झाल्यामुळे श्री. वरूडकर यांनी मुख्याध्यापक, जय शिवराय हायस्कूल, कसबा ठाणे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांच्याकडे पुन्हा अर्ज केला. त्यावर त्यांनी निर्णय घेतला नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अर्जदार सुनावणीस गैरहजर राहिल्यामुळे अर्ज दप्तरी दाखल केला. त्याविरूध्द श्री. वरूडकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील राज्य मुख्य आयुक्त, डॉ. सुरेश जोशी यांनी अमान्य केले. 'अपीलकर्त्यांना माहितीपेक्षा, त्यांची रजा मंजूर व्हावी ही कृति अपेक्षित आहे. शाळा समितीस रजा मंजूर करण्याचे अधिकार आहेत व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मानवतेच्या दृष्टीकोनातून रजा मंजूर करावी असे लिहिले असताना देखील 'अर्जदाराचे वर्तन सुधारल्यास त्यांचे अर्जाचा विचार करून निर्णय घेता येईल,' असे शाळा समितीने ठरविले आहे, याची सर्व माहिती अर्जदारास आहे. अर्जदारांना शाळा समितीचा निर्णय मान्य नसल्यास योग्य त्या प्राधिकाऱ्यांकडे त्याची दाद मागावी,' असे डॉ. जोशी यांनी आदेशात नमूद केले आहे.

श्री. वरूडकर गेल्या काही वर्षांपासून हा विषय शासनाच्या विविध खात्यांकडे मांडत आले आहेत. त्या संदर्भात संस्थेने वेळोवेळी आपली भूमिका स्पष्ट केली असल्याचे मुख्याध्यापक, जय शिवराय हायस्कूल, कसबा ठाणे, पन्हाळा, जि. कोल्हापूर यांनी वेळोवेळी आयोगाला व अन्य अधिकाऱ्यांना कळविले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी संस्थेला अनेकदा कळवूनही संस्थेने श्री. वरूडकर यांची रजा मंजूर केली नाही. श्री. वरूडकर यांचे रजा प्रकरण निकाली काढण्याबाबत या कार्यालयाकडून संबंधित संस्था व मुख्याध्यापक यांना वारंवार कळविण्यात आलेले आहे. तसेच श्री. वरूडकर यांची नामंजूर केलेली रजा मंजूर करावी. अन्यथा मुख्याध्यापकांचे वेतन, तसेच शालेय वेतनेतर अनुदान रोखण्यात येईल, असे इकडील दि. ७.८.२००७ चे पत्राने कळविणेत आलेले होते. तथापि उच्च न्यायालय, मुंबई येथे संस्थेने रिट याचिका क्र.६५८१/२००७ दाखल केली होती. सदर याचिकेची सुनाावणी दि. १८.९.२००७ रोजी होऊन अंतिम निर्णय होईतोपर्यंत संस्थेच्या ३ शाळांचे वेतन व वेतनेतर अनुदान स्थगित ठेऊ नये, असा अंतरिम आदेश झालेला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत संस्थेविरूध्द कोणतीही कार्यवाही करता येत नाही. रिट याचिका क्र.६५८१/२००७ चा अंतिम निर्णयानंतर कार्यवाही करणे शक्य होईल,' असे शिक्षणाधिकारी (माध्यमिक ), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दि. १२.८.२००९ रोजी आयोगाने विचारणा केल्यानंतर सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री. वरूडकर यांची मागणी माहितीपेक्षा रजा मंजूर करण्याची, तसेच याबद्दलच्या आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या मुख्याध्यापकांवर कारवाई करण्याची - म्हणजेच प्रशासकीय कार्यवाहीची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत तिचा समावेश होत नाही, तरीही विविध यंत्रणांनी त्यांच्या रजामंजुरीसाठी प्रयत्न केल्याचे दिसते. त्यासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दि. १२.८.२००९ च्या अहवालात नमूद केलेला खुलासा लक्षात घेण्यासारखा आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २० .८.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दऱ्याप्पा बाळाप्पा धुळाज
मु.पो.मुगळी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर, — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मुगळी,
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२ /कोल्हापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दऱ्याप्पा बाळाप्पा धुळाज
मु.पो.मुगळी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.परिक्षित दिलीप यादव

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मुगळी,
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.आनंद मधुकर कोठावळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.१२.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>यशवंत ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत शासनाकडून जून २००६ ते नोव्हेंबर २००६ या काळात उपलब्ध झालेला निधी किती आहे, २५ टक्के लोकवर्गणी झालेल्यांची नावासहित यादी, लोकवर्गणी नसेल तर १५ टक्के लोकवर्गणी कोणी व कोठून भरले त्यांची नावे, आतापर्यंत बांधकामासाठी झालेला खर्च व त्याचा तपशील, बांधकाम समितीत असलेल्यांची नावे, इमारत बांधकाम किती फुटाचे आहे, इंजिनिअरचे नाव, देखरेख व बांधकाम जमाखर्चाचा तपशील. | |

## विवेचन

मौजे मुगळी ग्रामपंचायत इमारतीच्या बांधकामाबाबतची आपण मागितलेली माहिती, या बांधकामातील भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मुगळी यांनी दिली नाही. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गडहिंग्लज यांच्याकडे तक्रार करुनही उपयोग झाला नाही, असे नमूद करुन अपीलकर्ता श्री.द-याप्पा बाळाप्पा धुळाज यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांची चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई केल्याचे आपल्याला लेखी स्वरुपात कळवावे, अशी विनंतीच्या स्वरुपातील मागणी त्यांनी अपिलात केली आहे.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. माहिती अपीलकर्त्याला देण्यात आली परंतु त्यांनी पोहोच न देता माहिती नेली, त्याचा रीतसर पंचनामा केलेला आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.आनंद मधुकर कोठावळे व अपिलीय प्राधिकारी श्री.परिक्षित दिलीप यादव यांनी प्रपत्रात नमूद केले. अपीलकर्ता हजर होते, परंतु त्यांनी प्रपत्रावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला, त्यामुळे सदर अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

दि.२७.११.२००६ रोजी आपण मागितलेली माहिती आपल्याला अद्याप मिळालेली नाही असे अपीलकर्ता श्री.धुळाज यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. जन माहिती अधिकाऱ्यांकडे माहिती उपलब्ध नसल्याने आपण शुल्क भरले नाही, असे त्यांनी प्रारंभी प्रतिपादन केले व नंतर शुल्क भरल्याचे निवेदन केले. आपल्याला कळविलेले शुल्क आपण भरले, श्री.कोठावळे यांनी माहिती दिली नाही, म्हणून तत्कालीन गटविकास अधिकारी श्री.व्ही.के.बन्ने यांच्याकडे तक्रार केली, त्यांनीही श्री.कोठावळे यांना दोन स्मरणपत्रे पाठविली व शिस्तभंगाच्या कारवाईची जाणीव दिली, तरीही श्री.कोठावळे यांनी माहिती दिली नाही, असे प्रतिपादन श्री.धुळाज यांनी केले. श्री.धुळाज यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे अपील केले नव्हते, केवळ तक्रारीच्या स्वरुपातील अर्ज केला होता. माहिती दिली असल्याचे ग्रामसेवकांचे म्हणणे होते, तरीही पुन्हा माहिती द्यावी असे आदेश आपण दिले, असे विद्यमान गटविकास अधिकारी श्री.परिक्षित यादव यांनी सांगितले. या आदेशानंतरही आपल्याला माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन श्री.धुळाज यांनी केले. श्री.धुळाज यांनी शुल्क भरल्यानंतर आपण समक्ष माहिती देण्यास गेलो होतो, ती त्यांनी घेतली नाही. नंतर मुगळी ग्रामपंचायत कार्यालयात त्यांनी माहिती स्वीकारली, परंतु पोहोच दिली नाही, म्हणून तसा पंचनामाही आपण केला. गटविकास अधिकाऱ्यांनी आपल्याकडे विचारणा केल्यानंतर या पंचनाम्याच्या व दिलेल्या माहितीच्या प्रतीसह आपण खुलासा केला, असे श्री.कोठावळे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. 'अपीलकर्ता यांची गडहिंग्लज येथे सोम ट्रेडिंग कंपनी या नांवाची फर्म असून सदर फर्ममध्ये बांधकामासाठी लागणाऱ्या स्टीलची विक्री होते. ग्रामपंचायत इमारतीचे बांधकाम सुरु होण्यापूर्वी अपीलकर्ता यांनी सदर बांधकामासाठी लागणारे विशिष्ट प्रकारचे स्टील (टाटा टिस्कॉन कंपनीचे) त्यांच्या फर्ममधून खरेदी करावे, अशी सूचना ग्रामपंचायतीला केलेली होती. परंतु, ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करीत वरील उठाठेव केलेली आहे. शेवटी अपीलकर्ता यांनी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांवर दबाव आणून इमारतीच्या स्लॅबसाठी वरील प्रकारचे स्टील त्यांच्या फर्ममधून

घेण्यास भाग पाडले,' असे श्री.कोठावळे यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात संबंधित बिलाच्या छायांकित प्रतीसह नमूद केले.

माहिती स्वीकारुन पोहोच देण्यास अपीलकर्ता श्री.धुळाज यांनी नकार दिल्याचे श्री.कोठावळे यांनी नमूद केले आहे, तसेच 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'ला उपस्थित असूनही प्रपत्रावर स्वाक्षरी करण्यास त्यांनी नकार दिल्याचे आयोगाच्या पुणे खंडपीठाचे तत्कालीन उपसचिव श्री.रविंद्र जगताप यांनी नमूद केले आहे. अपीलकर्त्याची ही कृती योग्य नाही.

उभय बाजूंची लेखी व तोंडी निवेदने पाहता माहिती न मिळाल्याची अपीलकर्त्याची तक्रार रास्त नसल्याचे स्पष्ट होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ७.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खलीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७७० / २००९/ कोल्हापूर | श्री. शंकर शामराव सुतार मु.पो. चरण, ता. शाहुवाडी, जि.कोल्हापूर | जन माहिती आधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, शाहुवाडी विभाग, जि.कोल्हापूर | प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक, जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय कोल्हापूर | दै.तरुण भारत मध्ये दिनांक ०८.०६.२००५ रोजी खाते वाटणीपत्रक प्रकरणी प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने दिलेला आत्मदहनाचा इशारा व त्या अनुषंगाने दिनांक १२.०६.२००५ रोजी बांगवडे पोलीस स्टेशनमध्ये घेतलेल्या जबाबाच्या नकलांबाबतची माहिती. | अपील अर्जावर सही नाही. |
| २ | ८५० / २००९/ कोल्हापूर | श्री. शरद सदाशिव मोरे मु.पो. गारगोटी, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर. | जन माहिती आधिकारी तथा वनक्षेत्र लिपिक, गारगोटी वन क्षेत्रपाल यांचे कार्यालय, गारगोटी, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा वन क्षेत्रपाल, वन क्षेत्रपाल गारगोटी यांचे कार्यालय, गारगोटी, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर | पाटगांव धरणाचे काम चालू झालेपासून आज अखेर वन हद्दीतील लाखो रुपयांच्य वनसंपतीच्या तोडणीची माहिती | १) सन १९९५ ते ९८ या कालावधीत ५१११७ वृक्षांची तोड झालेली असून त्यापासून तयार करण्यात आलेल्या मालाची विक्री करुन रु.४७,८५,४४०/- एवढा महसूल शासनास प्राप्त झाला आहे. तसेच वादळवा-याने पडलेल्या झाडांचा जळाऊ माल श्री.कुलकर्णी यांच्या मालकीच्या जागेत सुरक्षित ठेवला आहे, ते दिनांक २९/४/०९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | दिलेलेउत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे.<br>२) माहिती बनावट / खोटी कशी ते अपीलकर्त्याने कोठेही नमूद केलेले नाही. |
| ३ | ८५२/ २००९/ कोल्हापूर | श्री. विश्वास बाबुराव मुसळे ६५१, सी वॉर्ड, टिपुगडे गल्ली, कळंबा, ता.करवीर, जि.कोल्हापूर | जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ कोल्हापूर यांचे कार्यालय, कोल्हापूर | प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ कोल्हापूर यांचे कार्यालय, कोल्हापूर | सन २००५-०६, सन २००६-०७, सन २००७-०८ या कालावधीत ज्या शाखा अभियंता / सहायक अभियंता यांनी राजीनामे दिले त्यांचे बाबतची माहिती | १) अपीलकर्त्याने तीन वेगवेगळ्या माहितीच्या मागणी अर्जासाठी आयोगाकडे एकच अपील केले आहे.<br>२) प्रत्येक अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिलले उत्तर योग्य आहे. |
| ४ | ८५१/ २००९/ कोल्हापूर | श्री. मधुकर आण्णाप्पा सुतार मंगेश्वर कॉलनी, मु.पो.उंचगांच, ता.करवीर, जि.कोल्हापूर | जन माहिती अधिकारी तथा उप-कुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर | प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर | १) ज्या नियमाआधारे सेवा निवृत्ती वेतन पाच वर्षांनी कमी केले त्या नियमाची प्रत.<br>२) वेतन निश्चिती पुनर्पडताळणीस किती दिवस लागणार याचा खुलासा.<br>३) सेवानिवृत्ती वेतन पूर्ववत करावे ही मागणी | १) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत खुलासा, प्रस्तावीत कार्यवाही विषयी अभिप्राय इ. बाबी अंतर्भूत होत नाही.<br>२) सेवानिवृत्ती वेतन पूर्ववत करावे, ही बाब प्रशासकीय कार्यवाहीची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. ज्या नियमांआधारे सेवानिवृत्ती वेतन पाच वर्षांनी कमी केले त्या नियमाची प्रत व संदर्भित विषयातील सद्यस्थिती स्पष्ट करणारी माहिती जन माहिती अधिकारी यांनी दहा दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनुक्रमांक १ ते ४ वरील एकूण ४ अपिले (क्र. ७७०/२००९/कोल्हापूर, ८५०/२००९/कोल्हापूर, ८५२/२००९/कोल्हापूर, व ८५१/२००९/कोल्हापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ८५१/२००९/कोल्हापूर मध्ये निष्कर्षात नमूद / आदेशित केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल विहित मुदतपूर्तीनंतर आठ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०-०८-२००९